<u>विशेष दरखास्त क्र.२५/२०२४ मधील</u>
<u>नि.क्र.३१ खालील आदेश</u>.

MHSO100007792024

<u>विशेष दरखास्त क्र.२५/२०२४ मधील निशाणी क्र.३१ खालील आदेश.</u>

दरखास्तदाराने सदरचा अर्ज न्यायनिर्णीत ऋणकोची बँक खाती जप्त करण्यासाठी दिलेला आहे. दरखास्तदाराने सदरच्या अर्जात म्हटले आहे की, त्याने वि.दि.दा.क्र.६/२०१९ हा न्यायनिर्णीत ऋणको याच्याविरुध्द रक्कम वसुलीसाठी दाखल केला होता. न्यायनिर्णीत ऋणकोच्या सभेमध्ये ठराव क्र.९ द्वारे ता.३०.१२.२०२१ रोजी हुकूमनामाधारकासोबत समझोता करण्यासाठी ठरले होते. सदरच्या ठरावाप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणको याने रक्कम रुपये ९२,१५,२२६/– हुकूमनामाधारकास देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे ता.१३.०१.२०२२ रोजी न्यायालयासमोर तडजोड हुकूमनामा करण्यात आला होता. सदरच्या तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणको याने हुकूमनामाधारकास रक्कम रुपये ९२,१५,२२६/– तीन हप्त्यात देण्याचे ठरले होते.

२. सदरच्या तडजोड हुकूमनाम्यातील अटीप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणको याने पहिला हप्ता रक्कम रुपये ३०,००,०००/– धनादेशाद्वारे ता.१३.०१.२०२२ रोजी दिला होता. त्यानंतर दुसऱ्या हप्त्याची काही रक्कम रुपये १५,००,०००/– ही न्यायनिर्णीत ऋणको याने ता.२०.०१.२०२४ रोजी हुकूमनामाधारकाला देण्यात आली आहे. न्यायनिर्णीत ऋणकोने शेवटचा हप्ता रक्कम रुपये ४७,१५,२२६/– हा डिसेंबर–२०२४ च्या अगोदर हुकूमनामाधारकास देणे आवश्यक होते, परंतु त्याने सदरची रक्कम

हुकूमनामाधारकास आजपावेतो दिली नाही. न्यायनिर्णीत ऋणकोने तडजोड हुकूमनाम्यातील सर्व रक्कम हुकूमनामाधारकास देणे आवश्यक होते. न्यायनिर्णीत ऋणकोने सदरची उर्वरीत रक्कम हुकूमनामाधारकास दिली नाही.

३. न्यायनिर्णीत ऋणको हा साखर कारखाना असून तो महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणको, त्याचे अध्यक्ष, संचालक व कार्यकारी संचालक हे दैनंदिन व्यवहारासाठी जबाबदार आहेत. रविंद्र दिगंबर ओहाळ याने न्यायनिर्णीत ऋणकोचे मार्फत तडजोड हुकूमनाम्यावर सही केली आहे. त्यामुळे सदरचा हुकूमनामा न्यायनिर्णीत ऋणको याच्यावर बंधनकारक आहे. तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे रक्कम रुपये ४७,१५,२२६/– ही न्यायनिर्णीत ऋणको याचेकडुन हुकूमनामाधारकास येणे बाकी आहे. न्यायनिर्णीत ऋणको याने सदरचा तडजोड हुकूमनामा आजपावेतो आव्हानीत केला नाही. त्यामुळे सदरचा हुकूमनामा न्यायनिर्णीत ऋणको याचेवर बंधनकारक आहे. न्यायनिर्णीत ऋणकोने तडजोड हुकूमनाम्यातील रक्कम वेळेत हुकूमनामाधारकास न दिल्यामुळे हुकूमनामाधारकाचे रक्कम रुपये १०,००,०००/– चे नुकसान झाले आहे. त्यामुळे त्याबाबतचे विलंबाबाबतची सदरची रक्कम हुकूमनामाधारकास न्यायनिर्णीत ऋणको याने देणे आवश्यक आहे.

४. हुकूमनामाधारकाने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–४६, ४६–अ, ४६–ब प्रमाणे न्यायनिर्णीत ऋणको याची बँकेची खाती जप्त करण्यासाठी व बाकी रक्कम रुपये ४७,१५,२२६/– ही वसुल होऊन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. न्यायनिर्णीत ऋणको याचे खाते क्र.१५०६००७८००००००१ जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँक लि.शाखा–सदाशिवनगर, ता.माळशिरस, जि.सोलापुर, खाते क्र.१५०६०३१७००००००१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा–सदाशिवनगर, ता.माळशिरस जि.सोलापुर,खाते क्र.१५०६०२७९००००००२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा–सदाशिवनगर, ता.माळशिरस, जि.सोलापुर, बँक ऑफ बडोदा, शाखा–अकलुज, ता.माळशिरस खाते क्र.०८८५०२००००१२१, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा–अकलुज खाते क्र.११४३२११३८७०९, खाते क्र.१५०६०२७९०००००१९१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा–सदाशिवनगर, ता.माळशिरस, जि.सोलापुर, बँक ऑफ इंडिया, शाखा–अकलुज खाते क्र.०७०३२०१००००००४४४, सातारा जिल्हा मध्यवर्ती, शाखा–फलटण, ता.फलटण, जि.सातारा खाते क्र.१०४९०२९०००१२९, एम.एस.सी बँक लि., शाखा–पुणे खाते क्र.१०७६८/११, एम.एस.सी.बँक लि., शाखा–मुंबई खाते क्र.१०७६३/१७२१४, सोलापुर जनता सहकारी बँक लि., शाखा–माळशिरस खाते क्र.५८७०२५१०१००००१५९, एम.एस.सी.बँक लि. भांडारकर रोड, शाखा–पुणे खाते क्र.००३९२२०६३४००००००४६, शंकरराव मोहिते पाटील बँक लि., शाखा–अकलूज खाते क्र.००२०००२०२००००९५२, ॲक्सीस बँक लि., शाखा–अकलुज, जि.सोलापुर खाते क्र.९१२०२००१२२८७००००००९, बँक ऑफ इंडिया, शाखा–नातेपुते खाते क्र.०७२०२०११००००००९८, आय.सी.आय.सी.आय बँक लि., शाखा–अकलूज खाते क्र.६४९६०१०५०४७४ असे आहेत.

५. न्यायनिर्णीत ऋणको हा साखर कारखाना महाराष्ट्रात प्रसिध्द असून त्याची आर्थिक स्थिती भक्कम आहे, परंतु तो जाणीवपुर्वक

हुकूमनामाधारकाची बाकी रक्कम देण्याचे टाळाटाळ करत आहे. त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणको याची वरील सर्व बँकेतील खाती जप्त करणे आवश्यक आहे. न्यायनिर्णीत ऋणको याच्या बँक खात्यातील रक्कम न्यायालयात वर्ग करण्यात येऊन हुकूमनामाधारकाला त्याची थकीत रक्कम देण्यात यावी. न्यायनिर्णीत ऋणको याने हुकूमनामाधारकाची रक्कम थकविल्यामुळे हुकूमनामाधारक हा आर्थिक अडचणीत आला आहे. न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनामाधारकाची जाणीवपूर्वक रक्कम थकवली आहे. न्यायनिर्णीत ऋणकोची बँक खाती जप्त केली तर त्याचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचे दरखास्तीमधील रक्कम वसुल होऊन मिळणेसाठी वर नमुद केलेली न्यायनिर्णीत ऋणकोची बँक खाती जप्त करण्याची व सदरच्या जप्त केलेल्या खात्यातून तडजोड हुकूमनाम्यातील उर्वरीत रक्कम रुपये ४७,१५,२२६/- ही रक्कम हुकूमनामाधारकाला देण्याची विनंती हुकूमनामाधारकाने केली आहे. म्हणुन शेवटी त्याने त्याचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. सदरचे अर्जाला न्यायनिर्णीत ऋणकोने नि.क्र.३३ वर जबाब दिलेला आहे. त्याने त्यात कथन केले आहे की, वादीचा अर्ज कायदेशीर नसुन सदरची दरखास्त सुध्दा कायदेशीर व अंमलबजावणीयोग्य नाही. सदरचे हुकूमनाम्यात व्याजाची व खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश नाहीत. परंतु वादीने रक्कम रुपये ५,६५,८२७.१२/- व्याजाची व रक्कम रुपये ५,०००/- नोटीस खर्चाची मागणी केली असुन ती अवास्तव आहे. प्रतिवादीने यापूर्वी ता.२७.०१.२०२५ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिताचे, कलम-४७ नुसार म्हणणे देऊन हरकत घेतली आहे, परंतु त्याची अद्याप चौकशी झालेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिताचे, कलम-२ अन्वयेची व्याख्या पाहिली असता दिवाणी प्रक्रिया संहिताचे, कलम-३३ अन्वये ज्या

प्रकरणाची सुनावणी होऊन न्यायनिर्णय होतो, त्यालाच हुकूमनामा असे म्हणतात. तडजोड हुकूमनामा हा त्या अंतर्गत येत नाही.

७. तडजोड ही केवळ कराराच्या सदरात मोडते. त्यामुळे कराराची दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१ प्रमाणे अंमलबजावणी करता येत नाही. प्रतिवादीने सदरच्या प्रकरणात कलम–४७ नुसार जी हरकत घेतली आहे, त्याची चौकशी न करता वादीने सदरचा प्रतिवादीची बँक खाती जप्त करण्यासाठी अर्ज दिला आहे. वादीची प्रतिवादीकडे रक्कम रुपये ४७,१५,२२६/– ही तडजोड हुकूमनाम्याद्वारे येणे आहे परंतु ती दिवाणी प्रक्रिया संहिताचे, कलम–२ अन्वये हुकूमनामा या सदरात मोडत नाही. वादीने सदरच्या अर्जात मानसिक त्रास म्हणुन रुपये १०,००,०००/– ची मागणी केली आहे, सदरची मागणी बेकायदेशीर आहे. प्रतिवादी कारखाना हा आजारी होता व त्यावर प्रादेशिक सह संचालक साखर सोलापुर यांनी प्रशासकाची नेमणूक ता.०७.१२.२०१६ रोजी केली होती. त्यामुळे कारखान्याचे क्रशींग पुर्णपणे बंद होते. त्यानंतर सभासदांनी मा.उच्च न्यायालयात रिट पीटीशन क्र.३१८८/२०१७ हे दाखल केले होते. ते मंजुर झाल्यावर प्रशासकाची नेमणुक रद्द होऊन सदर कारखान्याची निवडणूक घेण्याचे आदेश झाले. त्याप्रमाणे संचालक मंडळाची निवडणुक होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे.

८. वादीसोबतचा व्यवहार हा प्रशासकाच्या पूर्वीचे संचालक मंडळ यांचे कार्यकाळातील आहे. सदरचे कारखान्यावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई यांची रक्कम रुपये ४०,६५,९७,०००/– बाबत सोलापुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी कारखान्यावर सहकार केस क्र. ५३/२०१७ दाखल केली होती. त्याचा निवाडा होऊन रक्कम रुपये

१२,३३,९४,७०५/- व सदर रक्कमेवर १३.५% प्रमाणे व्याज देण्याचा निवाडा झाला आहे. तसेच सहकार केस क्र. ४८/२०१७ याचाही निवाडा झाला असून त्यातही रक्कम रुपये १,६७,६२,४६६/- वर १४% प्रमाणे व्याज देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शंकरराव मोहिते पाटील बँक यांचे वाहन, चालक, ऊस वाहतुकदार यांना हमी देऊन दिलेल्या कर्जांचा दावा सोलापुर येथील सहकार न्यायालयात चालून त्यात सहकार अधिनियमचे कलम-९५(५) प्रमाणे कारखान्याची स्थावर मिळकत जप्त केली आहे व त्यावर स्थगितीचा आदेश आहे. त्या आदेशावर पुणे येथील अपिलेट कोर्टात ए.ओ.क्र.१८/२०२५ आहे, तो चालून निकाल झाल्यामुळे कारखान्याची स्थावर मिळकत जप्त झाली आहे. तसेच बँक ऑफ इंडिया, शाखा-नातेपुते यांची रक्कम रुपये २६,२०,७०,६२७/- देणे आहे. तसेच खाजगी व्यापारी यांची उचल रक्कम रुपये ४,४८,१२,६७४/- व को-जन व्यापारी रक्कम रुपये २,६५,१९,६९१/-, डिस्टलरी व्यापारी रक्कम रुपये ९,४३,६८२/- तसेच जुनी एफ.आर.पी. रक्कम रुपये १२,५९,८१,०००/- तसेच जुने कामगार पगार देणे रक्कम रुपये १३,४७,८२,३८५/- व कामगारांचे प्रोव्हीडंट फंडाची रक्कम रुपये २,३९,८७,२२०/- अशी कारखान्यास देणे बाकी आहे. कारखान्याच्या मालकीच्या सर्व मिळकती बँकेस गहाण आहेत.

९. सदरचे कारखान्याचे मागील दोन हंगामाला ऊसाचे गाळप कमी झाले असुन सन-२०२५ चा हंगाम पाहता उत्पादन खुप कमी झाले आहे. त्यामुळे कारखान्याची आर्थिक परिस्थिती खूप बिकट आहे. जर अश्या परिस्थितीत कारखान्याचे बँक खाते जप्त केल्यास कारखाना चालविणे अशक्य होऊन कामगाराचे पगार देणे, व्यापाऱ्यांचे देणे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बिले देणे व कारखान्याचा आर्थिक व्यवहार बंद पडणार आहे,

त्यामुळे कारखान्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. सदरचा बंद पडलेला आजारी कारखाना नुकताच चालु झाला आहे. सदरचा कारखाना बंद पडावा यासाठी वादीने सदरचा अर्ज दिलेला आहे. म्हणून शेवटी त्याने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१०. मी दरखास्तदारातर्फे विद्वान वकील श्री.राऊत व न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. दरखास्तदाराचे वकीलांनी युक्तीवाद केला की, हुकूमनामाधारकाने न्यायनिर्णीत ऋणकोच्या विरुध्द रक्कम वसुलीसाठी वि.दि.दा.क्र.०६/२०१९ हा दाखल केला होता. त्यामध्ये त्यांच्यात तडजोड हुकूमनामा होऊन न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनामाधारकाला रुपये ९२,१५,२२६/– हे तीन हप्त्यात देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणको याने पहिला हप्ता रक्कम रुपये ३०,००,०००/– हा ता.१३.०१.२०२२ च्या धनादेशाद्वारे दिला आहे. त्यानंतर दुसऱ्या हप्त्याची अंशतः रक्कम रुपये १५,००,०००/– न्यायनिर्णीत ऋणको याने हुकूमनामाधारकाला ता.२०.०१.२०२४ च्या धनादेशाद्वारे दिली. न्यायनिर्णीत ऋणको याने शेवटच्या हप्त्याची उर्वरीत रक्कम रुपये ४७,१५,२२६/– ही डिसेंबर–२०२४ च्या आत देणे आवश्यक होते परंतु त्याने त्याची पुर्तता केली नाही. न्यायनिर्णीत ऋणको याने तडजोड हुकूमनाम्यातील अटींची पुर्तता केली नाही, त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणको याने न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला आहे. न्यायनिर्णीत ऋणको याने तडजोड हुकूमनामा आजपावेतो आव्हानीत केला नाही. सदरचा तडजोड हुकूमनामा न्यायनिर्णीत ऋणको याचेवर बंधनकारक आहे. न्यायनिर्णीत ऋणको याने तडजोडीप्रमाणेची उर्वरीत रक्कम रुपये ४७,१५,२२६/– ही हुकूमनामाधारकास दिली नाही. म्हणून शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

११. याउलट न्यायनिर्णीत ऋणकोचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, सदरचा तडजोडीचा हुकूमनामा असल्यामुळे तो अंमलबजावणीयोग्य नाही. हुकूमनामाधारकास तडजोडीच्या रक्कमेवर व्याजाची किंवा नुकसान भरपाईची रक्कम मागता येणार नाही. सदरचे प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहिताचे, कलम–४७ प्रमाणेचे हरकतीवर चौकशी झालेली नाही. जर सदरचे न्यायनिर्णीत ऋणकोचे बँकेचे खाते जप्त करण्यात आले तर कारखाना बंद होईल. त्यांनी त्यांचे युक्तीवादाचे प्रीत्यर्थ **"एस.सतनाम सिंग आणि इतर विरुध्द सुरेंदर कौर आणि इतर, २००८ डी.जी.एल.एस.(सुप्रीम कोर्ट)१५९७"**, " **विनाका मनेरकर विरुध्द बँक ऑफ इंडिया आणि इतर, १९९६ (५) बॉम्बे सी.आर.४३१(मा.उच्च न्यायालय मुंबई)** ", **"लक्ष्मण सुर्वे आणि इतर विरुध्द मे.पेश बिल्डर्स १९९७ (१) बॉम्बे सी.आर.११५ (मा.उच्च न्यायालय मुंबई)** ", **"हाजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट विरुध्द अब्दुलखान आणि इतर २००२ (२) बॉम्बे सी.आर.५८९ (मा.उच्च न्यायालय मुंबई)** ", **"टी.सी.आय फायनान्स लि. विरुध्द कलकत्ता मेडीकल सेंटर लि., २००५ डी.जी.एल.एस.(सुप्रीम कोर्ट)७८०"**, **"बाबु लाल विरुध्द राज कुमार, ए.आय.आर.१९९६ सुप्रीम कोर्ट २०५०"** व "अ**रुण लाल विरुध्द युनियन ऑफ इंडिया, ए.आय.आर.२०११ सुप्रीम कोर्ट ५०६"**, **"महादु भोसले विरुध्द आप्पाजी गणपतराव, ए.आय.आर.२००३ बॉम्बे ३१४"** या अधिनिर्णयांचा आधार घेतला आहे. शेवटी त्यांनी हुकूमनामाधारकाचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१२. मी सदरचे प्रकरणातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. नि.क्र.४/१ वर माळशिरस न्यायालयातील वि.दि.दा.क्र.०६/२०२१ याचे तडजोडीचा हुकूमनामा पाहिला. त्यावरुन दिसून येते की, ता.१३.०१.२०२२ रोजी वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोड झालेली आहे. सदरच्या तडजोडीमध्ये असे ठरले होते की, वादीचे हिशोबाप्रमाणे दावा दाखल तारखेस प्रतिवादी हा वादीस मुद्दल, व्याज व खर्च असे एकूण रु.१,२५,४८,४५७.३६ पै. अशी रक्कम देणे लागत आहे. तथापि, आता वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात समझोता झालेला असून त्याप्रमाणे वादीने मुद्दल रक्कमेवरील व्याज व इतर खर्च सोडून दिलेले आहे व फक्त मुद्दल रु.९२,१५,२२६/- प्रतिवादीकडून घेण्यास वादी तयार झाला आहे. प्रतिवादी हा सदरची रक्कम रु.९२,१५,२२६/- तडजोडीने ३ हप्त्यांमध्ये वादीला देणार आहे. त्यापैकी पहिल्या हप्त्याचे रक्कम रु.३०,००,०००/- चा ता.१३.०१.२०२२ रोजीचा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सोलापूर, शाखा-सदाशिवनगर या बँकेचा धनादेश क्र.०१३५३३ हा प्रतिवादीने वादीस आजरोजी दिलेला आहे. दुस-या हप्त्याची रक्कम रु.३०,००,०००/- सन-२०२३ अखेर किंवा त्यापुर्वी धनादेशाने द्यायची आहे. तसेच तिस-या हप्त्याची रक्कम रु.३२,१५,२२६/- ही सन-२०२४ अखेर किंवा तत्पुर्वी धनादेशाने द्यायची आहे. प्रतिवादीने वादीस दिलेल्या चेकबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास व रक्कम वादीस न मिळाल्यास वादीस सदर रक्कम दरखास्तीने अथवा प्रचलित धनादेशाचे कायद्याने वसूल करण्याचा अधिकार आहे.

१३ सदरचे परिस्थीतीमध्ये दाव्याच्या तडजोडीबाबतची संबंधीत तरतुद पाहणे उचित होईल.

 <u>विशेष दरखास्त क्र.२५/२०२४</u>

<u>मधील नि.क्र.३१ खालील आदेश</u>.

दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२३, नियम–३ अन्वयेः– लेखी व पक्षकारांनी सह्या केलेला कोणताही कायदेशीर करारनामा किंवा तडजोडनामा याद्वारे दावा संपूर्णतः किंवा अंशतः समायोजित करण्यात आला आहे असे न्यायालयाची खात्री होईल अशा प्रकारे शाबीत झाल्यास, अथवा दाव्याच्या संपूर्ण विषयवस्तूच्या किंवा त्यापैकी काही अंशाच्या बाबतीत, प्रतिवादीने वादीचे समाधान केल्यास त्याबाबतीत, न्यायालयाने असा करारनामा किंवा तडजोडनामा अथवा समाधान यांची नोंद करण्याचा आदेश दिला पाहिजे आणि दाव्यांतील पक्षकारांशी तो संबंधित असेल तेथवर, त्यानुसार हुकूमनामा काढला पाहिजे. मग करारनामा तडजोडनामा किंवा समाधान यांची विषयवस्तू हीच दाव्याची विषयवस्तू असो वा नसो,

परंतू समायोजन किंवा समाधान करण्याचे ठरले होते असे एका पक्षकाराने अभिकथन केले व दुस–याने ते नाकबुल केले तर, न्यायालयाने त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे, पण त्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी तहकुबी दिली जाणार नाही. मात्र लेखी नमुद करावयाच्या काही कारणास्तव तशी तहकुबी देणे न्यायालयाला योग्य वाटले तर गोष्ट वेगळी.

[**स्पष्टीकरणः**–जो करारनामा किंवा तडजोडनामा ''भारतीय संविदा अधिनियम, १८७२, (१८७२ चा ९) या अन्वये रद्दबातल किंवा रद्दबातल होण्याजोगा असेल तो या नियमाच्या अर्थांतर्गत कायदेशीर असल्याचे मानले जाणार नाही.'']

१४. सदरच्या नियम–३ मध्ये पहिल्या भागात व दुस–या भागात फरक आहे. पहिल्या भागात अशी परिस्थीती दाखविण्यात आली आहे की, ज्यावेळी करारनामा किंवा तडजोडनामा हा लेखी व पक्षकारांनी सह्या केलेला असतो. सदरचा करारनामा किंवा तडजोडनामा हा न्यायालयासमोर ठेवण्यात येतो. ज्यावेळी न्यायालयाची खात्री होते की, सदरचा दावा संपुर्णतः किंवा अंशतः समायोजित करण्यात आला आहे व तो लेखी पक्षकारांनी सह्या केलेला आहे तर तो कायदेशीर असतो व सदरच्या करारनाम्यातील अटीप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात येतो. सदरच्या करारनाम्यावरुन किंवा तडजोडनाम्यावरुन दिसून येते की, वादीचा दावा हा आपसात संमतीने मान्य करण्यात आला आहे किंवा तो समायोजित करण्यात आला आहे व त्यामुळे त्यांनी मान्य केलेल्या अटींबाबत पुढे भविष्यात त्याची पुर्तता करण्यासाठी किंवा अंमलबजावणीसाठी दरखास्त दाखल करता येते. परंतु नियम–३ च्या दुस–या भागात अशी परिस्थीती दाखविण्यात आली आहे की, ज्यावेळी प्रतिवादी हा वादीच्या दाव्याचे समाधान करतो. प्रतिवादीने वादीचे दाव्याचे समाधान केल्यामुळे त्याची पुढे पुर्तता करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे पुढे वादीला प्रतिवादीविरुध्द कोणतेही अंमलबजावणी करण्याचा प्रश्न राहत नाही.

१५. सदरचे प्रकरणात मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरच्या तडजोडीच्या हुकूमनाम्यामध्ये तडजोडीची रक्कम रु.९२,१५,२२६/– ही ३ टप्प्यांमध्ये न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनामाधारकास देणेचे ठरले होते परंतु न्यायनिर्णीत ऋणकोने तडजोडीचे हुकूमनाम्यातील अटीची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे सदरचे तडजोडीचा हुकूमनामा हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२३, नियम–३ च्या पहिल्या भागामध्ये येतो. जर प्रतिवादीने तडजोडीच्या हुकूमनाम्याच्या दिवशी तडजोडीची पुर्ण रक्कम वादीला दिली

असती तर तो हुकूमनामा अंमलबजावणी योग्य नव्हता.

१६. सदरच्या प्रकरणात तडजोडीची रक्कम ३ टप्प्यामध्ये देण्याचे प्रतिवादीने कबूल केले होते, परंतु त्याने सदरची रक्कम तडजोडीच्या हुकूमनाम्याप्रमाणे वादीला दिली नाही. त्यामुळे तडजोडीच्या हुकूमनाम्याप्रमाणे दरखास्त अर्ज दाखल करुन वादी हा सदरची रक्कम प्रतिवादीकडून वसुल करु शकतो. सदरचे मुद्दयाचे प्रित्यर्थ मी ''**राजेंद्र चतुर्वेदी वि. गिता ओझा आणि इतर, ए.आय.आर. २०१९, झारखंड ४१ (मा.झारखंड उच्च न्यायालय)**'' या अधिनिर्णयाचा आधार घेत आहे. सदरचे अधिनिर्णयात मा.झारखंड उच्च न्यायालयाने निर्वाळा दिला आहे की, तडजोडीचा हुकूमनामा हा जर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२३, नियम–३ च्या पहिल्या भागांतर्गत येत असेल तर तो हुकूमनामा अंमलबजावणीयोग्य असतो. त्यामुळे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते की, सदरचा तडजोड हुकूमनामा हा अंमलबजावणीयोग्य आहे. त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणको यांच्या वकीलांच्या युक्तीवादामध्ये तथ्य नाही. मी न्यायनिर्णीत ऋणको यांचे विद्वान वकीलांनी दाखल केलेले "**एस.सतनाम सिंग (पश्चात)**", " **विनाका मनेरकर(पश्चात)** ", "**लक्ष्मण सुर्वे आणि इतर (पश्चात)**", "**हाजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट (पश्चात)**", "**टी.सी.आय फायनान्स लि. (पश्चात)**", "**बाबु लाल (पश्चात)**" व "अ**रुण लाल (पश्चात)**," व"**महादु भोसले (पश्चात)**" अधिनिर्णय वाचून पाहिले. परंतु सदरचे अधिनिर्णयातील तथ्य व सदरचे प्रकरणातील तथ्य पुर्णपणे भिन्न असल्यामुळे सदरचे अधिनिर्णयातील प्रमाण सदरचे प्रकरणात लागू होत नाही.

१७. न्यायनिर्णीत ऋणको यांचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला आहे की, त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, कलम–४७ अन्वये सदरच्या दरखास्तीला नि.क्र.१३ अन्वये हरकत घेतली आहे. त्यामुळे सदरच्या हरकतीची चौकशी झाल्याशिवाय सदरचा अर्ज चालू शकत नाही. मी सदरचा नि.क्र.१३ चा अर्ज हा वाचून पाहिला. त्यामध्ये न्यायनिर्णीत ऋणको याने त्याच्यात व हुकूमनामाधारकामध्ये झालेला तडजोड हुकूमनामा मान्य केलेला आहे. तसेच त्यांनी पुढे मान्य केले आहे की, सदरच्या तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे प्रतिवादीने वादीला रक्कम रु.९२,१५,१२६/– ही ३ हप्त्यांमध्ये देण्याचे ठरले होते. प्रतिवादीने वादीला पहिल्या हप्त्याच्या रक्कम रु.३०,००,०००/– चा धनादेश दिला होता. त्यानंतर दुसरा हप्ता हा सन २०२३ अखेर रक्कम रु.३०,००,०००/– होता व तिसरा हप्ता सन २०२४ अखेर रक्क्म रु.३२,१५,२२६/– असे देण्याचे ठरले होते. त्यांनी पुढे मान्य केले आहे की, सदरच्या ठरलेल्या रक्कमेपैकी त्यांनी एकूण रक्कम रु.४५,००,०००/– दिले असून उर्वरित रक्कम रु.४७,१५,२२६/– बाकी आहे. सदरच्या हरकतीत न्यायनिर्णीत ऋणको याने व्याजाची व नोटीस खर्चाची रक्कम नाकारलेली आहे. थोडक्यात, न्यायनिर्णीत ऋणको याने त्याच्याकडे हुकूमनामा धारकाची रक्कम रु.४७,१५,२२६/– बाकी असल्याचे मान्य केले आहे. सदरची रक्कम सन २०२४ च्या अखेर देण्याचे तडजोड हुकूमनाम्या अन्वये ठरले होते. परंतु न्यायनिर्णीत ऋणको याने सदरची रक्कम हुकूमनामाधारकाला दिलेली नाही.

१८. मी वर नमुद केल्याप्रमाणे, वादीने प्रतिवादविरुध्द रक्कम रु.१,२५,४८,४५७.३६ पैसे वसुलीसाठी वि.दि.दा.क्र.६/२०१९ हा दाखल केला होता. त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोड झाली व वादीने मुद्दल रक्कमेवरील व्याज व इतर खर्च सोडून दिले व फक्त मुद्दल रक्कम

रु.९२,१५,२२६/- ही प्रतिवादीकडून घेण्यास तयार झाला. सदरचा तडजोडीचा हुकूमनामा ता.१३.०१.२०२२ रोजी झाला. त्यानंतर सदरची रक्कम रु.९२,१५,२२६/- ही प्रतिवादीने वादीला ३ हप्त्यात सन २०२४ अखेर किंवा तत्पुर्वी देण्याचे ठरले होते. परंतु प्रतिवादीने फक्त रक्कम रु.४५,००,०००/- दिली. प्रतिवादीने उर्वरित रक्कम रु.४७,१५,२२६/- ही वादीला विहित मुदतीत दिली नाही. त्यानंतर वादीने सदरची दरखास्त दाखल केली आहे.

१९. सदरची दरखास्त दाखल केल्यानंतर न्यायनिर्णीत ऋणको याने काहीही रक्कम हुकूमनामाधारकास दिलेली नाही. न्यायनिर्णीत ऋणको यास वारंवार संधी देऊन सुध्दा त्याने सदरचे प्रकरणात दरखास्तदाराची रक्कम न्यायालयात जमा केली नाही. न्यायनिर्णीत ऋणको हा सदरची रक्कम हुकूमनामाधारकास देण्याचे जाणीवपुर्वक टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते. सदरची रक्कम ही जास्त असल्यामुळे न्यायनिर्णीत ऋणको यांची बँकेतील खाते जप्त करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. हुकूमनामाधारकाने न्यायनिर्णीत ऋणको याची १८ बँकेतील खाती जप्त करण्याची विनंती केली आहे. परंतु एकाच वेळी सर्व बँकातील न्यायनिर्णीत ऋणको याची खाती जप्त करणे आवश्यक नाही. सध्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा-सदाशिव नगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर या बँकेतील न्यायनिर्णीत ऋणको याचे खाते क्र.१५०६००७८००००००१, १५०६०३१७००००००१, १५०६०२७९००००००२ व १५०६०२७९००००१९१ जप्त करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणुन वरील सर्व परिस्थीतीचा विचार करुन मी खालील आदेश पारीत करित आहे.

विशेष दरखास्त क्र.२५/२०२४
मधील नि.क्र.३१ खालील आदेश.

आदेश

१. अर्ज नि.क्र.३१ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात विनंती केल्याप्रमाणे श्री.शंकर सहकारी साखर कारखाना लि., सदाशिवनगर यांचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि., शाखा– सदाशिवनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील खाते क्र.१५०६००७८०००००००१, १५०६०३१७०००००००१, १५०६०२७९०००००००२ व १५०६०२७९००००१९१ यातील एका खात्यात रक्कम रु.४७,१५,२२६/– शिल्लक असेल तर ते एक खाते किंवा जर एका खात्यात रु.४७,१५,२२६/– शिल्लक नसेल तर वर नमुद केलेल्या चारही खात्यातून एकूण रक्कम रु.४७,१५,२२६/– ही दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–४६ प्रमाणे जप्त करण्यात येत आहे.

३. सदरची वर नमुद केलेली रक्कम मॅनेजर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि., सदाशिवनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी हुकूमनामाधारकाशिवाय दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–४६(२) प्रमाणे पुढील आदेश होईपर्यंत इतर कोणालाही देऊ नये, असे कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.06.09 17:30:21 +0530

दि.०९.०६.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

१६ विशेष दरखास्त क्र.२५/२०२४
मधील नि.क्र.३१ खालील आदेश.

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णयाची/आदेशाची फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील/आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री.म.पां.सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा/आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.०९.०६.२०२६.

न्यायनिर्णय/आदेश टंकलिखित केलेला दि.०९.०६.२०२६.

न्यायनिर्णय/आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.०९.०६.२०२६.

न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याचा दि.०९.०६.२०२६.

स्वाक्षरित/–
(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
माळशिरस.